# युरोप
१७८९ ते १८७०

# आधुनिक जग
१८७१ ते १९६५



डॉ. श. गो. कोलारकर

प्रकरण पहिले

# फ्रेंच राज्यक्रांती

## (१७८९)

"फ्रेंच राज्यक्रांतीच्या उद्रेकापासून युरोपचा इतिहास एका देशाच्या, एका घटनेच्या आणि एका व्यक्तीच्या इतिहासात समाविष्ट झालेला आहे. तो देश म्हणजे फ्रान्स, ती घटना म्हणजे फ्रेंच राज्यक्रांती आणि ती व्यक्ती म्हणजे नेपोलियन बेनापार्ट होय."

फ्रेंच राज्यक्रांती ही केवळ फ्रान्स देशाच्या किंवा युरोपच्या इतिहासातील नव्हे तर जगाच्या इतिहासातील एक महत्त्वपूर्ण घटना मानली पाहिजे. इ.स.१७८९ मध्ये फ्रान्स या देशात झालेली ही राज्यक्रांती युरोपातील मध्ययुगीन परंपरागत राजेशाहीला प्रचंड धक्का देणारी ठरली. फ्रेंच राज्यक्रांतीमुळे फ्रान्समधील जुलमी व अनियंत्रित राज्यसत्ता संपुष्टात आली. या क्रांतीद्वारा केवळ बुरबाँ (Bourbon) घराण्याच्या जुन्या राजवटीला मुठमाती मिळाली, असे नसून परंपरागत विशेषाधिकार उपभोगणाऱ्या आणि जनतेवर अत्याचार करणाऱ्या सरंजामदार व धर्मगुरु या वर्गाच्या हक्कांनाही तिलांजली मिळाली. या क्रांतीने स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व हा नव्या युगाचा संदेश संपूर्ण युरोप खंडाला पोहचविला. म्हणूनच फ्रेंच राज्यक्रांतीचे स्वरुप केवळ राजकीय होते, असे मानता येणार नाही. भोळसर धर्मश्रद्धा आणि सामाजिक विषमता यावर प्रहार करणाऱ्या या क्रांतीचे स्वरुप अतिशय व्यापक असून या क्रांतीने खऱ्या अर्थाने एका नव्या युगाची सुरुवात केली असे म्हणावे लागेल.

१८ व्या शतकाच्या अखेरच्या दशकाचा आणि १९व्या शतकाचा युरोपचा इतिहास या क्रांतीकारक घटनेशी अत्यंत निगडीत असा आहे. "फ्रेंच राज्यक्रांतीच्या उद्रेकापासून युरोपचा इतिहास एका देशाच्या एका घटनेच्या आणि एका व्यक्तीच्या इतिहासात समाविष्ट झालेला आहे. तो देश म्हणजे फ्रान्स, ती घटना म्हणजे फ्रेंच राज्यक्रांती आणि ती व्यक्ती म्हणजे नेपोलियन बेनापार्ट होय."अशा या महान

प्रकरण दुसरे

# नेपोलियन बोनापार्ट

''माझे खरे वैभव माझ्या चाळीस लढायातील विजयात नाही, तर जे कधीही पुसले जाणार नाही. व चिरंतर राहील असे जे माझे कायदा संहितेचे कार्य आहे, त्यात सामावलेले आहे.''

– नेपोलियन बोनापार्ट

जगाच्या इतिहासात काही महान सेनापती होऊन गेले त्यात नेपोलियन बोनापार्ट यांचा समावेश होतो. नेपोलियन बोनापार्ट आपला आत्मविश्वास आणि कर्तृत्वाच्या जोरावर सामान्य परिस्थितीतूनही सम्राट पदापर्यंत पोहचला होता. नेपोलियनला क्रांतीचे अपत्य (Child of the Revolution) असे म्हटले जाते. त्याने अनेक युद्धभूमीवर विजय मिळविले. परंतू त्याचबरोबर फ्रान्समध्ये अंतर्गत धोरण राबवितांना प्रशासकीय सुधारणाही केल्या.

रूसो, व्हाल्टेअर, मॉक्टेस्क्यू अशा विचारवंताचा प्रभाव पडलेला, सैन्यात भरती होऊन 'छोटा हवालदार' म्हणून प्रसिद्धीस आलेल्या, नेपोलियन बोनापार्टला इटलीच्या मोहिमेत यश प्राप्त होऊन अफाट लुट मिळाली. त्यामुळे नेपोलियनच्या आकांक्षा वाढल्या आणि पुढे तो फ्रान्सचा बादशहा झाला.

## ▸ नेपोलियन बोनापार्टचा उदय :-

रुसोला फ्रेंच राज्यक्रांतीचा प्रेषित मानण्यात येते. या प्रेषिताने कॉर्सिका बेटावर सुरू असलेल्या स्वातंत्र्यलढ्याला उद्देशून १७६२ मध्ये एक भाकीत केले गेले होते की, ''हे बेट साऱ्या युरोपला आश्चर्यचकीत करेल.'' त्यानंतर सातच वर्षांनी भूमध्य समुद्रातील कॉर्सिका बेटातील आयातचो या गावी १५ ऑगस्ट १७६९ रोजी नेपोलियन बोनापार्टचा जन्म झाला. नेपोलियन बोनापार्टचा पिता चार्लस बोनापार्ट आणि माता लिटेशिया रामोलिना हे होत. त्याचा पिता वकिलीचा व्यवसाय करत होता. त्यांनी नेपोलियनला १७७९ मध्ये पॅरिस येथील सेंट जर्मेन या

लष्करी शाळेत दाखल केले. नेपोलियनला सुरुवातीच्या काळात फ्रेंच भाषा फारशी अवगत नव्हती. त्यामुळे आणि नेपोलियन या शब्दाचा अर्थ जंगली सिंह नेपो- जंगल, लियन - लायन) असा होतो. म्हणून इतर विद्यार्थी त्याला चिडवत असत. परंतु तो अत्यंत चाणाक्ष आणि बुद्धीमान असल्यामुळे शाळेतील अभ्यासक्रमात त्याने चांगली प्रगती साधली होती. गणित, इतिहास, भूगोल हे त्याचे आवडते विषय होते. त्याने वयाच्या १६ व्या वर्षी फ्रान्सच्या सैन्यात नोकरी स्वीकारली.

**१) फ्रान्सच्या सैन्यात भरती :-** रूसो हा आपला गुरु आहे असे मानणाऱ्या नेपोलियनने रुसो आणि व्ट्राल्टेअर, तुर्गो यांच्या विचार सरणीचे त्याने अध्ययन केले होते. इतिहासाविषयी तो म्हणतो, "इतिहास म्हणजे ज्ञानदीप होय. आपल्या मनातील सारे पुर्वग्रह इतिहासाच्या अध्ययनाने दूर होतील." या विधानावरून इतिहासाविषयी असलेले त्याचे प्रेम दिसून येते. सैनिक म्हणून नोकरीवर असतांना रजा घेवून तो कार्सिका बेटात जावून राहू लागल्यामुळे फ्रेंच सरकारला त्याच्या राष्ट्रप्रेमाविषयी संशय आल्याने त्याला नोकरी वरुन काढण्यात आले. नेपोलियनला नोकरी गेल्याने हाल अपेष्टा सहन करावी लागली. १७७२ च्या सुमारास उद्योग व्यवसायाच्या निमित्ताने पॅरीस शहरात आला तेव्हा तेथे आरजकता पसरलेली होती. अशास्थितीत फ्रान्सच्या कायदेमंडळाने नेपोलियनला सेनेत दाखल करून घेतले.

इंग्रजांकडून टुलोन बंदर परत घेण्याची कामगीरी नेपोलियनवर सोपविल्यानंतर अवघ्या पाचच दिवसात टुलोन बंदर जिंकून घेतले. त्यामुळे कायदे मंडळाचा विश्वास संपादन झाला. १७९३ मधील टुलोन विजय संपुर्ण इतिहासात महत्त्वाचा मानला जातो. १७९४ मध्ये रॉबेस्पीअरचा शिरच्छेद झाल्यानंतर नेपोलियनवर आरोप ठेवून त्याला कैद करण्यात आले. पुढे परिस्थिती बदलली, दहशतीचे राज्य संपुष्टात आले. अशा स्थितीत कनव्हेनशचा सभासद बारस यांनी कनव्हेनशनच्या बचावासाठी नेपोलियन बोनापार्टला आमंत्रित केले. त्यानुसार नेपोलियनने १७९५ मध्ये बंडखोरांचा नि:पात करून कनव्हेशनला वाचविले. या कामगिरीने नेपोलियनला प्रसिद्धी मिळाल्याने त्याच्यावर इटलीच्या मोहीमेचे जबाबदारी सोपविण्यात आली.

**२) इटलीची मोहीम (१७९६-९७) :-** ऑक्टोबर १७९५ मध्ये

प्रकरण तिसरे

# मेटरनिक युग
## (१८१५-१८४८)

- व्हिएन्ना काँग्रेस
- युरोपचा संघ
- मेटरनिक पद्धती

---

**''पराभूत राष्ट्रांकडून मिळालेल्या लुटीची वाटणी करण्यासाठी जमलेल्या विजयी राष्ट्राची परिषद''**

**– जेण्टझ, व्हिएन्ना परिषदेच्या सेक्रेटरी**

नेपोलियन बोनापार्टच्या पाडावानंतर युरोपची पुनर्रचना करण्याचे कार्य युरोपातील प्रमुख राष्ट्रांना करावे लागले. अठराव्या शतकातील युरोप एकोणाविसाव्या शतकाच्या पहिल्या दशकात पूर्णपणे बदलून गेला होता आणि हे सर्व बदल नेपोलियनने आपल्या सोयीनुसार केले होते. त्यामुळे युरोपात प्रचंड उलथापालथ झाली होती. युरोपातील देशामधील जुन्या राजसत्ता संपुष्टात येवून नव्या राजसत्ता स्थापन झाल्या होत्या. नेपोलियनचा पाडाव होईपर्यंत युरोपातील राष्ट्रांचे उद्दिष्ट 'नेपोलियनचा पाडाव'करणे, हेच असल्यामुळे प्रमुख राष्ट्रांमध्ये मतभेद नव्हते. परंतु आता नेपोलियनच्या पाडावानंतर युरोपची पुनर्रचना कशी करावयाची या प्रश्नावर प्रमुख राष्ट्रांमध्ये मतभेद निर्माण झाले. मतभेदातून युद्ध होते की काय ? अशी भीती निर्माण झाली. परंतु युरोपियन राष्ट्रांमध्ये युद्ध करण्याची शक्ती राहिली नव्हती. नेपोलियनचा लिपलिकच्या युद्धात पराभव झाल्यानंतर १० एप्रिल १८१४ रोजी नेपोलियनला 'एल्बा' बेटावर पाठविण्यात आले. त्यानंतर युरोपच्या पुनर्रचनेचे कार्य हाती घेण्यात आले. त्याकरिता युरोपियन राष्ट्रांच्या प्रतिनिधींची एक परिषद व्हिएन्ना येथे बोलविण्यात आली. या परिषदेस 'व्हिएन्ना काँग्रेस' म्हटले जाते.

व्हिएन्ना परिषदेच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी युरोपचा संघ अस्तित्वात आला. त्यानंतर १८१५ ते १८४८ पर्यंत युरोपातील राजकारणावर मेटरनिकच्या प्रतिगामी विचारांचा प्रभाव होता. या कालखंडाला मेटरनिक युग म्हणतात.

## व्हिएन्ना परिषद :-

व्हिएन्ना येथे आयोजित करण्यात आलेल्या या परिषदेला 'व्हिएन्ना काँग्रेस' म्हणून ओळखले जाते. या परिषदेत उपस्थित असलेल्या प्रतिनिधींनी काही उद्देश निश्चित करून निर्णय घेतले.

**अ) व्हिएन्ना परिषदेचे उद्देश–**

१) युरोपची पुनर्रचना करणे.

२) युरोपात शांतता निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे.

३) नेपोलियनने जिंकलेल्या प्रदेशाची वाटणी करणे.

४. क्रांतीकारी चळवळींना आळा घालणे.

या उद्देशाच्या परिपुर्तीसाठी युरोपियन राष्ट्रांतील प्रतिनिधी व्हिएन्ना परिषदेत उपस्थित होते.

**ब) परिषदेला उपस्थित असलेले प्रतिनिधी –** व्हिएन्ना परिषदेला तुर्कस्थान वगळता युरोपातील बहुतेक राष्ट्रांचे प्रतिनिधी उपस्थित होते. त्यात राजे, महाराजे किंवा त्याचे प्रतिनिधी, राजपूत्र, सेनापती, राजकारणी, मुत्सद्दी वगैरेंचा समावेश होता. ऑस्ट्रियाचा चान्सलर (पंतप्रधान) मेटरनिक यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झालेल्या या परिषदेत ऑस्ट्रियाचा राजा फ्रान्सिस पहिला. रशियाचा राजा झार अलेक्झांडर पहिला आणि त्याचा मंत्री नेसलरोड, प्रशियाचा राजा विल्यम फ्रेडरिक तिसरा हा हार्डेनबर्ग व डम्बोल्डस यांच्यासह उपस्थिती होता. इंग्लंडचा परराष्ट्रमंत्री कॅसलरिघ, सेनापती ड्युक ऑफ वेलिंग्टन, फ्रान्सचा पंतप्रधान टेलेरँड, पोपचा प्रतिनिधी कार्डिनल साल्व्हे इत्यादी मुत्सद्दी उपस्थित होते. परिषदेवर मेटरनिक आणि रशियाचा राजा झार अलेक्झांडर पहिला यांचे प्रभूत्व होते.

परिषद सप्टेंबर १८१४ मध्ये सुरु झाली. परंतु नेपोलियनने एल्बा बेटावरून स्वत:ची सुटका करून २० मार्च १८१५ रोजी पॅरिसमध्ये दाखल झाला. त्यामुळे

स्वाक्षऱ्या केल्या होत्या. मेटरनिकच्या मते 'पवित्र संघ म्हणजे निरर्थकपणाची गोष्ट आहे.' अशा प्रतिक्रया व्यक्त झालेल्या हा संघ रशियाचा झार अलेक्झांडर यांच्या मृत्यूनंतर (१८२५) संपुष्टात आला.

**ब) युरोपचा संघ (चतु:संघ) :-**

पवित्रसंघ धार्मिक, नैतिक व आध्यात्मिक स्वरुपाचा होता. याच काळात मेटरनिकच्या प्रयत्नाने ऑस्ट्रिया, रशिया, प्रशिया आणि इंग्लंड यांनी चतु:संघ स्थापन झाला.

**१) चतु:संघाचे उद्देश –**

i) व्हिएन्ना काँग्रेसने केलेली व्यवस्था कायम टिकविणे.

ii) युरोपात शांतता कायम राखणे.

iii) राजेशाही विरूद्ध असलेल्या शक्तीचा पाडाव करणे.

iv) फ्रेंच राज्यक्रांतीच्या तत्त्वांना प्रतिबंध घालणे.

v) युरोपात सत्ता समतोल राखणे.

vi) युरोपाच्या विकासासाठी संघातील चार राष्ट्रांमध्ये मैत्रीपूर्ण संबंध ठेवणे.

vii) युरोपात उद्‌भवलेल्या समस्यांवर विचार विनिमय करण्यासाठी संघातील मित्र राष्ट्रांच्या परिषदांचे आयोजन करणे.

युरोपच्या संघाने निश्चित केलेल्या उद्देशांच्या पुर्तीसाठी युरोपातील विविध ठिकाणी चार परिषदांचे आयोजन केले. त्यामुळे १८१८ ते १८२२ या काळाला 'परिषदाचे युग' असेही म्हटले जाते.

**२) परिषदा –**

**अ) एक्सलाशापेलची परिषद (१८१८)** – चतु:संघाची पहिली परिषद प्रशियाच्या ताब्यातील 'एक्सलाशापेल' येथे भरली. या परिषदेत फ्रान्सच्या प्रश्नावर विचार विनिमय करण्यात आला. फ्रान्सने युद्ध खंडणी दिली होती. फ्रान्समध्ये अंतर्गत स्थैर्य निर्माण झाले होते. फ्रान्सपासुन युरोपच्या शांततेला धोका नव्हता. म्हणून ड्युक ऑफ वेलिग्टंनच्या नेतृत्वाखाली ठेवण्यात आलेल्या फौजा फ्रान्समधून काढण्यात आल्या. आणि फ्रान्सला संघाचे सभासदत्व देण्यात यावे या निर्णयावर एकमत झाले. त्यामुळे युरोपच्या संघाने (चतु:संघ) 'संयुक्त युरोप' असे स्वरुप धारण केले. परंतु बड्या राष्ट्रांच्या हितसंबंधाविषयी चर्चा झाली तेव्हा

### अ) व्हिएन्ना परिषद आणि इटली (१८१५) :-

नेपोलियनच्या पाडावानंतर युरोपची पुनर्रचना करण्यासाठी व्हिएन्ना येथे युरोपियन बड्या देशांनी आपल्या स्वार्थाचे निर्णय घेतले. इटलीतील लोकांच्या भावनांची कदर न करता व्हिएन्ना परिषदेने इटलीचे अनेक भागात विभाजन केले. इटलीतील बराचसा प्रदेश आपल्या नियंत्रणाखाली असावा, अशी ऑस्ट्रियाच्या मेटरनिकची इच्छा होती. त्यानुसार इटलीची पुनर्रचना करण्यात आली होती.

१) उत्तर इटलीतील लोम्बार्ड व व्हेनेशिया हे प्रदेश ऑस्ट्रियाला देण्यात आले.

२) ल्युका, मॉडेना व टस्कनी या संस्थानांवर हॅप्सबर्ग घराण्यातील राजपुत्राची सत्ता प्रस्थापित करण्यात आली.

३) पार्मा संस्थांनांवर नेपोलियनची पत्नी मेरी लुसीची राजवट स्थापन करण्यात आली. कारण मेरी ऑस्ट्रियाची राजकन्या होती.

४) नेपल्स व सिसिली या संस्थानांवर बुरबॉ घराण्यातील फर्डिनांड पहिला याची सत्ता प्रस्थापित करण्यात आली.

५) रोम आणि मध्य इटलीचा प्रदेश पोपच्या नियंत्रणाखाली सोपवण्यात आला.

६) सार्डीनिया व पिडमाँटच्या राज्यावर इटालियन वंशाचा सेव्हॉय घराण्यातील व्हिक्टर इमॅन्युएल पहिला याची सत्ता स्थापन करण्यात आली.

व्हिएन्ना परिषदेने इटलीची चिरफाड करुन अनेक संस्थानांमध्ये विभाजन केले. त्या संस्थानांवर ऑस्ट्रियाचा प्रभाव असलेल्या विविध वंशातील राजांची अनियंत्रित सत्ता प्रस्थापित करण्यात आली. व्हिएन्ना परिषदेचे प्रतिनिधी आणि मेटरनिक यांनी राष्ट्रवादी चळवळीचे उच्चाटन करण्याच्या भूमिकेतून निर्णय घेतले.

### ब) इटलीच्या एकीकरणातील अडथळे :-

१) **ऑस्ट्रिया** – ऑस्ट्रियाचा चान्सलर मेटरनिक प्रतिगामी विचारसरणीचा होता. तो राष्ट्रवादी चळवळींना दडपण्याचा प्रयत्न करीत होता.

२) **पोप** – मध्य इटली आणि रोमवर अधिकार असलेला पोप कॅथालिक धर्मियांचे श्रद्धास्थान होते. पोपच्या रोमवर आक्रमण करणे म्हणजे

एकीकरण पार्श्वभूमी तयार झाली.

## अ) जर्मनीच्या एकीकरणाची पार्श्वभूमी :-

**१) नेपोलियनचा ऱ्हाईनचा राज्यसंघ** – १८०६ मध्ये नेपोलियन बोनापार्टने जर्मनीवर स्वारी करुन पवित्र रोमन साम्राज्य नष्ट केले. तसेच ऑस्ट्रिया आणि प्रशिया या शक्तीशाली राष्ट्रांना पराभूत करुन बव्हेरिया, वुर्टन्बर्ग, बेडन वगैरे निवडक १४ राज्यांना एकत्रित करुन 'ऱ्हाईनचा राज्यसंघ' (Confederation of Rhine) स्थापन केला. नेपोलियन बोनापार्टच्या जर्मन संस्थांनावरील वर्चस्वामुळे त्या संस्थांनामध्ये एक कायदा, एकच शासनपद्धती यामुळे एकराष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागली. नेपोलियनच्या कारकिर्दीत तिनशे जर्मन संस्थांनाची संख्या एकोणचाळीसवर आली. अशा या ऱ्हाईनच्या राज्यसंघात हर्डर, फिश्ते, गटे, कॉन्ट आणि हेगेल या जर्मन तत्ववक्त्यांनी जे लिखाण केले त्यामुळेही जर्मनीत एक राष्ट्रीयत्वाची भावना वाढीस लागण्यास मदत झाली.

**२) प्रशियन राष्ट्रवादाचा विकास** – नेपोलियन बोनापार्टने प्रशियाचा पराभव करुन अपमानास्पद टिलसिटचा तह लादला. त्यामुळे प्रशियन जनता दुखावली जाऊन त्यांच्यात स्वाभिमान जागृत झाला. १८०७ ते १८१५ या काळात स्टीन, हार्डनबर्ग या मुत्सद्यांनी आणि शार्न हॉर्स्ट या लष्करी नेत्याने प्रशियाला राजकीय, सामाजिक, आर्थिक आणि लष्करीदृष्ट्या सबळ करुन जर्मनीच्या एकीकरणाचे नेतृत्व करण्यास प्रवृत्त केले. प्रशियाच्या सैन्यात राष्ट्रनिष्ठा निर्माण होऊन त्यांच्यात प्रखर राष्ट्रवादी भावना जागृत झाल्या. तसेच बर्लिन विद्यापीठाची स्थापना केली. राष्ट्रीय शिक्षणाच्या योजना आखल्या. वेठबिगारी बंद केली. गुणवत्तेनुसार नोकऱ्या दिल्या, ग्रामीण भागातील स्थानिक संस्थामध्ये सुधारणा करण्यासाठी कायदे केले. या सर्व सुधारणामुळे प्रशियाच्या जनतेमध्ये उत्साह निर्माण झाला. नेपोलियन बोनापार्टचा पाडाव करण्यात इतर युरोपियन राष्ट्रांबरोबर प्रशियन लष्कराने बजावलेली कामगिरी प्रशियाच्या राष्ट्रवादी भावनेचे प्रतिक होते.

**३ ) व्हिएन्ना परिषद आणि जर्मनी** – नेपोलियन बोनापार्टच्या पाडावानंतर युरोपची पुनर्रचना करण्यासाठी व्हिएन्ना येथे युरोपियन देशांची परिषद भरली. या परिषदेचे अध्यक्षपद मेटरनिकला देण्यात आले. तो प्रतिगामी धोरणाचा आणि राष्ट्रवादाविरोधी होता. नेपोलियनच्या ऱ्हाईनच्या राज्यसंघामुळे जर्मन

## ड) जर्मनीच्या एकीकरणाची वाटचाल :-

बिस्मार्कने मुख्यमंत्री झाल्यावर जर्मनीच्या एकीकरणासाठी सावधगिरीच्या राजकारणावर भर दिला. आपले लष्करी सामर्थ्य आजमावण्यासाठी ऑस्ट्रिया ऐवजी डेन्मार्कशी युद्ध करण्याचा निर्णय घेतला. बिस्मार्कच्या या योजनेस राजा विल्यम पहिला यांची अनुमती होती. मुख्यमंत्री झाल्यानंतर बिस्मार्क आपल्या भाषणात म्हणाला होता की, "संसदेतील भाषणामुळे आणि बहुमताने घेतलेल्या निर्णयामुळे गंभीर स्वरुपाच्या आजच्या समस्या सोडविता येणार नाहीत. त्यासाठी रक्त आणि कणखर नीती यांची आवश्यकता आहे." यावरुन बिस्मार्कचा युद्धावर किती विश्वास होता याचा दाखला मिळतो. त्यामुळे बिस्मार्कने लॅंडटॅग या लोकसभेची पर्वा न करता लष्कराचे आधुनिकीकरण केले. ऑस्ट्रियाने १८६३ मध्ये जर्मन संस्थानांच्या प्रश्नाचा विचार करण्यासाठी एक अधिवेशन बोलाविले. परंतु या अधिवेशनास राजा पहिला विल्यम याला उपस्थित राहण्यापासून परावृत्त केले. या घटनेने ऑस्ट्रियाने बोलविलेले अधिवेशन निष्फळ ठरले. त्यानंतर १८६४ मध्ये डेन्मार्कशी युद्ध पुकारुन आपले लष्करी सामर्थ्य अजमावून पाहिले.

### १) डेन्मार्कशी युद्ध (१८६४) :-

श्लेस्विग आणि हॉल्स्टिन हे दोन संस्थाने डेन्मार्ककडे होते. हॉल्स्टिन परगण्यात बहुसंख्य लोक जर्मन होते. तर श्लेस्विग परगण्यात जर्मन आणि डॅनिश लोक समप्रमाणात होते. डेन्मार्कला हे दोन्ही प्रदेश आपल्या वर्चस्वाखाली आणावयाचे होते. अशा स्थितीत १८४८ मध्ये या दोन्ही प्रदेशात जर्मन लोकांनी क्रांतीकारी चळवळी केल्या. परंतु युरोपातील इतर चळवळीप्रमाणेच ही चळवळ दडपून टाकण्यात आली. मात्र डेन्मार्कचा राजा फ्रेडरिक सातवा याने हे दोन्ही प्रदेश डेन्मार्कला जोडले जाणार नाहीत, असे आश्वासन दिले. त्यामुळे ही समस्या तात्पुरती सुटली.

i) **डेन्मार्ककडून आश्वासन भंग** - १८६३ मध्ये राजा फ्रेडरिक सातवाचा मृत्यू झाला. त्याच्या मृत्यूनंतर डेन्मार्कच्या गादीवर आलेल्या ख्रिश्चन नववा या राजाने श्लेस्विग आणि हॉल्स्टिनचे प्रदेश डेन्मार्कला जोडून टाकले आणि या प्रदेशावर आपले वर्चस्व राहिल, अशी राज्यघटना बनविली. या घटनेमुळे डेन्मार्कने दिलेल्या आश्वासनाचा भंग झाला.

**ii) बिस्मार्कचा ऑस्ट्रियाशी तह** – बिस्मार्कला श्वेस्विग आणि हॉल्स्टिनचे प्रदेश प्रशियात सामील करावयाचेहोते ते जिंकून घेण्यासाठी डेन्मार्कशी युद्ध करणे अपरिहार्य होते. शिवाय आपले लष्करी सामर्थ्य अजमावून पहावयाचे होते. परंतु ऑस्ट्रियाने डेन्मार्कची बाजू घेवू नये म्हणून डेन्मार्कशी युद्ध पुकारण्यापूर्वी बिस्मार्कने ऑस्ट्रियाशी तह केला आणि युद्धातून जी प्राप्ती होईल त्याची उभयतांमध्ये वाटणी करून घ्यावी असे ठरले.

**iii) प्रशियाची युद्ध घोषणा** –जर्मन राज्यसंघाच्या वतीने प्रशियाने डेन्मार्कशी युद्धाची घोषणा करुन डेन्मार्कने आपली नवी राज्यघटना ४८ तासात रद्द करावी अन्यथा युद्धास तयार राहावे,असा निर्वाणीचा खलीता प्रशियाने डेन्मार्कला पाठविला. अर्थात एवढ्या अल्पावधीत डेन्मार्कच्या राजाला निर्णय घेणे अशक्य असल्याने प्रशिया आणि ऑस्ट्रियाच्या संयुक्त फौजा फेब्रुवारी १८६४ मध्ये डेन्मार्कमध्ये शिरल्या. त्या संयुक्त फौजांनी अल्पकाळात डेन्मार्कचा पराभव केला. डेन्मार्कला श्वेस्विग आणि हॉल्स्टिन या प्रदेशावरील हक्क सोडून द्यावा लागला.

**iv) गॅस्टाईन करार** – प्रशिया आणि ऑस्ट्रिया यांच्यात श्लेस्विग व हॉल्स्टिन यांच्या वाटणीवरुन मतभेद निर्माण झाला. त्यामुळे ऑगस्ट १८६५ मध्ये गॅस्टाईन येथे करार झाला. त्या करारानुसार श्लेस्विग प्रशियाला तर हाल्स्टिन ऑस्ट्रियाला देण्यात आला. हा करार 'कनव्हेनशन ऑफ गॅस्टाईन' (Convention of Gestein) या नावाने ओळखला जातो.

## २) ऑस्ट्रियाशी युद्ध (१८६६) :-

बिस्मार्कने डेन्मार्कचा पराभव करण्यासाठी ऑस्ट्रियाची मदत घेतली असली तरी ऑस्ट्रिया हाच जर्मनीच्या एकीकरणातील अडथळा आहे याची बिस्मार्कला जाणीव होती. म्हणून प्रशियाचे लष्करी सामर्थ्य वाढविणे, ऑस्ट्रियाला एकाकी पाडणे आणि युरोपातील इतर देशांची सहानुभूती मिळविणे, या उद्देशाने प्रेरित होऊन बिस्मार्कने फ्रान्स, रशिया आणि इटली यांच्याशी मैत्रीचे संबंध प्रस्थापित केले.

**i) ऑस्ट्रियाची ताकद अजमाविणे** – डेन्मार्कशी प्रशिया आणि ऑस्ट्रियाच्या संयुक्त फौजांनी युद्ध केले. तेव्हा युद्ध भूमीवर ऑस्ट्रियाच्या फौजांचे सामर्थ्य, लष्करी डावपेच आणि उणिवांची यथार्थ जाणिव झाली. डेन्मार्क विरुद्ध